# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240 - 2336172**

**No,CGRF/AZ/U / 186 / 2009 / 20 /**   **Date :-**

**To,**
**The Executive Engineer ( Administration)**
**O/O Superintending Engineer ,**
**O&M Urban Circle , M.S.E.D.C.L.,**
**Aurangabad.**

**Sub:- Forwarding of grievance in respect Shri Sondge Rohidas Baburao ,Plot No.4, Martand Nagar, Sataragaon, Aurangabad. Consumer No. 490011847428.**

**Dear Sir,**

**Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Shri Sondge Rohidas Baburao ,Plot No.4, Martand Nagar, Sataragaon, Aurangabad.**

**You are requested to submit your para wise reply on the grievance within 15 days from the date of receipt of this letter along with related documents.**

**The hearing in this matter is kept on 25/02/2009 at 14=30 Hrs.**

**Encl: As above**

**Member/Secretary**
**CGRF(AZ) MSEDCL**
**Aurangabad.**

Copy to:-

**Shri Sondge Rohidas Baburao ,**
**Plot No.4, Martand Nagar,**
**Sataragaon,**
**Aurangabad.**

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१८६/२००९/२०**

**तक्रार दाखल दिनांक :- १०/०२/२००९**
**निकाल दिनांक :- १७/०३/२००९**

**श्री रोहीदास बाबुराव सोडंगे,**
**प्लॉट नं. ४, गट नं. ४ मार्तडनगर,**
**सातारागांव औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.४९००११८४७४२८) अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**शहर मंडळ औरंगाबाद.**

**गैरअर्जदार**

| | | |
|---|---|---|
| **कोरम** | **विष्णु अं. हंबिरे** | **अध्यक्ष** |
| | **हेमंत अ. कापडीया** | **सदस्य** |
| | **प्र. अ. सगणे** | **सदस्य/सचिव** |

# आदेश

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक १०/०२/२००९ रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक २५/०२/२००९ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) अर्जदाराने महावितरण वीज कंपनीकडुन घरगुती वापरासाठी वीज पुरवठा घेतला असुन त्यांनी वीज मीटरवरील नोदीप्रमाणे वीज आकारणी न करता सरासरीवर आधारीत बिल आकारण्यात आले. हे चुकीचे वीज बिल दुरूस्त करून द्यावे अशी त्यांनी महावितरणच्या छावणी विभागाकडे विनंती केली पण त्यांच्या तक्रारीची दखल न घेण्यात आल्यामुळे त्यांनी मंचात ही तक्रार दाखल केली असुन महावितरण कंपनीस सुधारीत वीज बिल देण्याबाबत आदेश देण्याची विनंती मंचास केली आहे.

२) दिनांक २५/०२/२००९ रोजी झालेल्या सुनावणीस अर्जदार श्री रोहीदास सोंडगे उपस्थित होते. महावितरण तर्फे शहर विभागाचे नोडल अधिकारी श्री जी.एस. राठैार उपस्थित होते.त्यांनी छावणी विभागाकडुन या प्रकरणाची कागदपत्रे उपलब्ध न झाल्याचे कारण सांगत सुनावणीची तारीख पुढे वाढविण्याची विनंती केली. मंचाने त्यांची विनंती मान्य करीत पुढील सुनावणी ०३/०३/२००९ रोजी घेण्याचे निश्चीत केले.

३) दिनांक ०३/०३/२००९ रोजी झालेल्या सुनावणीस अर्जदार व नोडल अधिकारी उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी या प्रकरणाची कागदपत्रे उपलब्ध न झाल्यामुळे सुनावणीची तारीख पुन्हा वाढविण्याची विनंती केली. मंचाने नोडल अधिकारी यांना शेवटची संधी देत पुढील सुनावणी ०७/०३/२००९ रोजी घेण्याचे ठरविले.

४) दिनांक ०७/०३/२००९ रोजी झालेल्या सुनावणीस अर्जदार व महावितरण चे नोडल अधिकारी उपस्थित होते.नोडल अधिकारी यांनी अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीवर आपला जवाब मंचात दाखल केला अर्जदारास महावितरण कंपनीतर्फे चुकीचे वीज बिल आकारण्यात आल्याचे मान्य करीत अर्जदारास सुधारीत वीज बिल देण्याची तयारी दर्शविली व तसा प्रस्ताव मंचात दाखल केला. नोडल अधिकारी यांनी दाखल केलेला वीज बिल रिव्हीजन प्रस्तावाची एक प्रत अर्जदारास देण्यात आली. अर्जदारास या वीज बिल रिव्हीजन प्रस्तावावर आपले म्हणणे दिनांक ०९/०३/२००९ पर्यंत दाखल करण्याचे सांगत मंचाने प्रकरण निकासाठी ठेवले.

५) दोन्ही बाजुकडुन मंचात दाखल झालेल्या कागदपत्रावरून व मंचासमोर झालेल्या सुनावणीवरून असे आढळुन येते की, महावितरण कंपनीतर्फे अर्जदारास घरगुती वापरासाठी वीज पुरवठा करण्यात आला असुन त्यांच्याकडे बसविण्यात आलेल्या मीटरचा क्रमांक ९००६६९५९८० असा आहे. महावितरण कंपनीतर्फे अर्जदारास दिनांक १४/०३/२००८ रोजी वीज पुरवठा करण्यात आला पण मीटरवरील नोंदीप्रमाणे बिल आकारणी न करता अर्जदारास सरासरीवर आधारीत बिल देण्यात आल्याचे दिसुन येते. अर्जदाराने महावितरणच्या छावणी उपविभागाकडे दिनांक ४/०६/०८,२८/०८/०८,२२/१२/०८,३०/१२/०८ रोजीच्या पत्राव्दारे मीटरवरील रिडिंगप्रमाणे वीज बिल देण्याची विनंती केली. त्याचप्रमाणे मीटरवरील रिडिंग देखील कळविली पण महावितरण कंपनीने त्याची कोणतीही दखल न घेता व वीज बिल सुधारून न देता चुकीच्या वीज बिलाची आकारणी केली असल्याचे दिसुन येते. महावितरण तर्फे अर्जदारास १५/१०/२००८ ते २०/११/२००८ या काळात मागील रिडिंग १० व चालु रिडिंग १८७५ दाखवत १८६५ युनीट वापराचे तीन महीन्याचे वीज बिल दिले महावितरणचे नोडल अधिकारी यांनी आपल्या जवाबात हे बिल ३ ऐवजी ८

महिन्याचे असल्याचे मान्य करीत ते विभागुन देण्याची तयारी दर्शविली व अर्जदारास २८७७.३८ रूपये क्रेडीट देण्याची तयारी दर्शविली मंचाने नोडल अधिकारी यांनी दिलेल्या सुधारीत वीज बिलाची पाहणी केल्यावर ते योग्य असल्याचे आढळुन आले.

वरील सर्व बाबीचे निरीक्षण केल्यावर अर्जदाराने मंचात दाखल केलेली तक्रार योग्य असल्याचे तसेच महावितरण तर्फे अर्जदाराच्या तक्रारीची दखल न घेता त्यांना चुकीच्या वीज बिलाची आकारणी केल्याचे स्पष्ट होते.

# आदेश

१) महावितरण कंपनीने अर्जदारास १५/१०/२००८ ते २०/११/२००८ या काळात दिलेले वीज बिल मागील ८ महीन्यासाठी विभागुन सुधारीत वीज बिल ३० दिवसात द्यावे.

२) सदरील सुधारीत वीज बिलात कोणतेही व्याज व दंड लावु नये.

३) महावितरण कंपनीने अर्जदारास रूपये २५०/- नुकसान भरपाई तीस दिवसात द्यावी.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

**हेमंत अ. कापडिया**
**सदस्य**

**प्र. अ. सगणे**
**सदस्य/सचिव**

**विष्णु अं. हंबिरे**
**अध्यक्ष**

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१८६/२००९/२०** **दिनांक ;-**

**प्रति,**
**श्री रोहीदास बाबुराव सोडंगे,**
**प्लॉट नं. ४ गट नं. ४,**
**मार्तंडनगर,सातारागांव**
**औरंगाबाद.**

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/यु/१८६/२००९/२० )

आपण दिनांक १०/०२/२००९ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

**सदस्य/सचिव**
**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.**

**प्रती, सविनय सादर,**
**मुख्य अभियंता परिमंडळ कार्यालय,**
**म.रा.वि.वि.क.मर्या.औरंगाबाद.**

**प्रती,कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद**
**माहिती व उचीत कारवाही करीता**

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा, बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**